# पारंपारिक आयुर्वेद वैद्यक-शास्त्र

**प्रा. दीपक ताटपुजे, सातारा.**

आपले आणि आपल्या कुटुंबाच्या आरोग्य स्वास्थासाठी प्राचीन काळापासून आयुर्वेद वैद्यक शास्त्राचा उपयोग आपल्या देशात करण्यात येतो. काष्ठौषधी, धातु, वनौषधी आदींचा वापराबरोबर आधुनिक वैद्यकशास्त्र-निदान पध्दतींचा तसेच उपकरणे, शस्त्रक्रियेसाठी धारदार शस्त्र आदींचा वापर या वैद्यकशास्त्राच्या विकासाला पुरक ठरला आहे.

आयुर्वेद औषधांची निर्मिती, रोगनिदानासाठी दवाखाने, रूग्णालये, औषधी वनस्पतींच्या निर्मितीसाठी शेती उद्योगांचे सहाय्य घेऊन स्वयंरोजगार निर्मिती करणे आदी संधी या क्षेत्राने उपलब्ध करून दिल्या आहेत. या उल्लेखित क्षेत्रांकडे आजही आवश्यक त्या प्रमाणात स्वयंरोजगार केंद्रित झाला नसल्याने या क्षेत्रात अत्यंत कमी स्पर्धा आहे. त्यामुळे व्यवसाय निर्मिती आणि वृध्दीसाठी या क्षेत्रास संपूर्ण संधी आहे.

कायचिकित्सा, द्रवगुण शास्त्र, शरीर विज्ञान, संस्कृत-संहिता, स्त्रीरोग-प्रसुति शास्त्र, शल्य-शालाक्य विज्ञान आदी शाखा-उपशाखांमध्ये आयुर्वेद वैद्यक शास्त्राचा विकास झाला आहे. रोग्याचे मूळ संपुर्णपणे नष्ट करणे हे प्रमुख उद्दीष्ट असणाऱ्या या वैद्यक शास्त्र प्रणालीचा लोक फायदा करून घेऊ लागले आहेत. यामुळे या रोगनिदान प्रणालीचा वापर आजकाल मोठ्या प्रमाणात होत आहे.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, गुलटेकडी, पुणे : या ठिकाणी ''योग आयुर्वेद प्रारंभिक पदविका (डिप्लोमा)'' हा अभ्यासक्रम इयत्ता १० वी किंवा इयत्ता १२ वी उत्तीर्ण ही किमान पात्रता आवश्यक आहे. तसेच या ठिकाणी ''अभ्यंग मर्दन तंत्रज्ञ पदविका'' (आयुर्वेद मसाजिस्ट) हा अभ्यासक्रम इयत्ता १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी चालवण्यात येतो.

खालील संस्थांमधुन 'बॅचरल ऑफ आयुर्वेदिक मेडिसिन अॅन्ड सर्जरी' (BAMS) हा पदवी अभ्यासक्रम चालवला जातो. इयत्ता १२ वी (पी.सी.बी.) ५०% ही किमान शैक्षणिक पात्रता आवश्यक आहे. त्यापैकी काही संस्था :

१. आयुर्वेद महाविद्यालय, रंकाळा वेस, कोल्हापुर.
२. यशवंत आयुर्वेद महाविद्यालय, कोडोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापुर.
३. आयुर्वेद महाविद्यालय, पेठ-वडगाव, ता. जि. कोल्हापुर.
४. वसंतदादा पाटील आयुर्वेद मेडिकल कॉलेज, दक्षिण शिवाजीनगर, सांगली.
५. शेठ गोविंदरावजी आयुर्वेद महाविद्यालय, २१/ए/१३, सम्राट चौक, सोलापुर.
६. आयुर्वेद महाविद्यालय, गणेशवाडी, पंचवटी, नाशिक - ४२२ ००३.
७. कमलादेवी गौरीदत्त अत्रेय पुनर्वसू आयुर्वेद महाविद्यालय, नेताजी सुभाष रोड, मुंबई.
८. आर. ए. पोद्दार आयुर्वेद मेडिकल कॉलेज, वरळी, मुंबई - ४०० ०१८
९. आयुर्वेद महाविद्यालय, शंकर नगर, पुसद (यवतमाळ)
१०. येरला मेडिकल ट्रस्टचे आयुर्वेद महाविद्यालय, त्रिवेणी संगम, म्युनिसिपल बिल्डींग, करी रोड, मुंबई - १२.
११. आयुर्वेद महाविद्यालय, नालासोपरा, ता. वसई, जि. ठाणे.
१२. पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे आयुर्वेद महाविद्यालय, २७, प्राधिकरण, पुणे.
१३. भारती विद्यापीठाचे आयुर्वेद महाविद्यालय, धनकवडी-कात्रज, पुणे.
१४. आयुर्वेद महाविद्यालय, श्रीशिवाजी - नगर (राहुरी), अहमदनगर.

१५. आयुर्वेद महाविद्यालय, पुणे-नाशिक रोड, संगमनेर (अहमदनगर)
१६. चैतन्य आयुर्वेद महाविद्यालय, साकेगाव, भुसावळ.
१७. दादासाहेब नाईक आयुर्वेद महाविद्यालय, मुंबई-आग्रा हायवे, नागाव (धुळे)
१८. आयुर्वेद महाविद्यालय, देवपुर, धुळे.
१९. शीव आयुर्वेद महाविद्यालय, शीव, मुंबई - ४०० ०२२.
२०. आयुर्वेद महाविद्यालय, सावंतवाडी, जिल्हा सिंधुदुर्ग
२१. आयुर्वेद महाविद्यालय, बोराडी, ता. शिरपुर, जि. धुळे.
२२. गंगाधरशास्त्री पुणे आयुर्वेद महाविद्यालय, अहमदनगर - ४१४ ००१.
२३. अष्टांग आयुर्वेद महाविद्यालय, २०६२, सदाशिव पेठ, वैद्य ह. बा. परांजपे चौक, विजयानगर कॉलनी, पुणे.
२४. टिळक आयुर्वेद महाविद्यालय, रास्ता पेठ, पुणे.
२५. शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, वजिराबाद, नांदेड.
२६. शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, उस्मानाबाद.
२७. आर. टी. आयुर्वेद महाविद्यालय, केडिया प्लॉटस्, जठार रोड, अकोला.
२८. विदर्भ आयुर्वेद महाविद्यालय, हनुमान व्यायाम मंडळ आवार, अमरावती.
२९. डाह्याभाई माओजी मजिठिया आयुर्वेद महाविद्यालय, यवतमाळ.
३०. श्री गुरूदेवा आयुर्वेद महाविद्यालय, मु.पो. गुरूकुंज (मोसरी), जि. अमरावती.
३१. श्री आयुर्वेद महाविद्यालय, धन्वंतरी नगर, नागपुर.
३२. शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, रघुजीनगर, नागपुर.
३३. शेठ चं. मुथा आर्याग्ल वैद्यक महाविद्यालय, गेंडामाळ, सातारा.
३४. महाराष्ट्र आरोग्य विना अनुदान आयुर्वेद महाविद्यालय, हडपसर, पुणे - २८.

नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ आयुर्वेद, माधव-विलास पॅलेस, जयपुर (राजस्थान) येथे आयुर्वेदिक नर्सिंग कोर्स चालविण्यात येतो.

महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांर्तगत विविध शासकीय आणि अनुदानित महाविद्यालयांमधुन तीन वर्ष मुदतीचे विशिष्ठ विषयातील पदव्यूत्तर पदवी अभ्यासक्रम ''एम. डी. (आयुर्वेद)'' चालवण्यात येतात.